**मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर लिमिटेड, गट क्रमांक १९६/१, प्रवरानगर, लोणी, तालुका -राहाता, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७१२), महाराष्ट्र यांच्या कार्यरत आसवणी प्रकल्पात रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादन करण्यासाठी सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस / सिरप यांचा वापर करुन प्रस्तावित क्षमता विस्तारण ६०.० ते २४०.० केएलपीडी करणे करिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचे इतिवृत-**

---

मे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर लिमिटेड, गट क्रमांक १९६/१, प्रवरानगर, लोणी, तालुका -राहाता, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७१२), महाराष्ट्र यांच्या कार्यरत आसवणी प्रकल्पात रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादन करण्यासाठी सी / बी हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस / सिरप यांचा वापर करुन प्रस्तावित क्षमता विस्तारण ६०.० ते २४०.० केएलपीडी करणे करिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ नुसार त्यांच्या कार्यालयीन आदेशान्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,अहमदनगर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - **सदस्य**
मुंबई यांचे प्रतिनिधी
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहमदनगर

श्री संजीव अ. रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदीप निचित, अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

**आयोजक** यांनी सांगितले की कोविड-१९ आणि ओमिक्रॉन संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त ४० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणीत संधि देण्यात येईल. **आयोजक** यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर सिन्वबैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून सुनावणीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. **आयोजक** यांनी जनसुनावणीचे महत्व व प्रक्रिया याबाबतची माहिती दिली. तसेच उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ अहमदनगरकडे एकूण ०५ पाठिंबा दर्शविणारी निवेदने प्राप्त झालेली आहेत असे सांगितले.

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार** यांनी प्रस्तावित विस्तारिकरणाबाबत सादरहीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात निर्माण होणा-या सांडपाण्यावर सी.पी.यु. मध्ये प्रक्रिया केली जाईल आणि त्याचा पुनर्वापर केला जाईल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज / शून्य द्रव निःस्सारण तत्वावर असेल. सदरहू प्रकल्पामुळे १५० व्यक्तींना प्रत्यक्ष व अंदाजे ४०० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि उपलब्ध होईल. **पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले

की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदार निधी  हा रुपये १२०.४० लाख एवढा नियमांनुसार करण्यात येईल.

**सदस्य** यांनी नमूद केले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये म.प्र.नि. मंडळाचा भेट अहवाल जोडणे चुकीचे असून या अहवालासोबत आवश्यक विविध परवान्यांच्या प्रती जोडलेल्या नाहित.

**आयोजक,** यांनी सांगितले की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील ब-याच त्रुटी दाखविल्या आहेत. अहवालातील परिचयाचा भाग हाच चुकलेला आहे. संचालक व त्यांची पदे चुकलेली आहेत, तरी ते तपासून दुरुस्त करण्यात यावेत.

**अध्यक्ष,** यांनी विचारले की हा साखर कारखाना सन २०२१ मध्ये कुठल्या काळात सुरु होता? **व्यवस्थापकीय संचालक** यांनी उत्तर दिले की नोव्हेंबर, २०२० ते मे, २०२१ पर्यंत ऊस गाळप सुरु होते. **अध्यक्ष** यांनी मत मांडले की ज्यावेळी प्रकल्प हा पुर्ण क्षमतेने कार्यरत होता, त्या काळात पर्यावरण सर्वेक्षण करणे व प्रदूषणाची पातळी अभ्यासणे अपेक्षित होते परंतु पर्यावरण सर्वेक्षण हे गाळप बंद असताना करण्यात आलेले आहे. **अध्यक्ष** यांनी सांगितले की सर्वेक्षण अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसते की सर्वेक्षण, पाणी व हवेचे नमुने हे प्रकल्पापासून लांब असलेल्या ठिकाणांचे / गावांचे गोळा करण्यात आलेले आहेत. वास्तविक प्रदूषणाची पातळी समजण्यासाठी प्रकल्पाच्या जवळील गावांतील पाणी व हवेचे नमुने जास्त गोळा करणे अपेक्षित आहे.

**आयोजक** यांनी पाच कि.मी. अंतरावरील कोल्हार बुद्रुकचे पाणी व हवेचे नमुने गोळा केले का याबाबत विचारणा केली.

**अध्यक्ष** यांनी विचारणा केली की कारखान्याचे गाळप चालू असतानाच्या काळात वा-याची दिशा कशी होती वा असेल असा अभ्यास केलेला आहे का? **अध्यक्ष** यांनी पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले स्पष्टीकरण हे न्यायीक नाही असे सांगितले.

**सदस्य** यांनी मत मांडले की टीओआर प्रमाणे प्रदूषणाचा प्रभाव समजण्यासाठी गाळप चालू असतानाचे सर्वेक्षण करणे अपेक्षित आहे. पर्यावरण सल्लागार यांनी केलेले सर्वेक्षण हे कारखाना बंद असताना केलेले आहे असे दिसते.

**अध्यक्ष,** यांनी सांगितले की अहवालात फक्त ६० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचाच उल्लेख आहे. मात्र आसवणी प्रकल्प हा प्रथम १५ केएलपीडीचा होता, नंतर तो ३२ केएलपीडीचा होता, याबाबतचा कुठेही उल्लेख अहवालात नाही.

**प्रकल्प अधिकारी** यांनी उत्तर दिले की १५ केएलपीडीचा आसवणी प्रकल्पाचा विस्तार करुन ३२.० केएलपीडीचा प्रकल्प करण्यात आलेला होता व हा ३२.० केएलपीडीचा आसवणी प्रकल्प हा atmospheric/वातावरणीय होता. तो आता आम्ही भंगारात काढत आहोत.

**अध्यक्ष** यांनी मत मांडले की अहवालात याचा उल्लेख नाही. त्यामुळे प्रकल्पाची सद्यस्थितीतील क्षमता व परिणाम याबाबत विसंगती दिसून येते.

**आयोजक** यांनी किती क्षमतेचा आसवणी प्रकल्प कार्यरत आहे याबाबत विचारणा केली.

**प्रकल्प अधिकारी** यांनी उत्तर दिले की ६० केएलपीडीचा आसवणी प्रकल्प कार्यरत आहे. ३२ केएलपीडीचा atmospheric/वातावरणीय तंत्रज्ञानावर असलेला प्रकल्प भंगारात काढणार आहोत.

**सदस्य,** यांनी विचारणा केली की टीओआर पान नं. ४ मध्ये नं.८ ची अटीमध्ये ब्रिकेट फायर बॉयलर असे नमूद केलेले आहे. तथापि अहवालात बगॅस फायर्ड बॉयलर असे नमूद आहे.

**अध्यक्ष** यांनी मत मांडले की सदर अहवाल पुर्णपणे दुरुस्त करून सादर करावा.

**सदर सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झालेले आहेतः-**

१) **<u>श्री गणेश रंगनाथ विखे, राहणार-लोणी बुद्रुक, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री विखे** यांनी प्रकल्प विस्तारिकरणास समर्थन आहे असे सांगितले.

**सदस्य** यांनी आपण कारखान्यात काम करता का याबाबत विचारणा केली.

**श्री विखे** यांनी सांगितले की ते कामगार नसून ग्रामस्थ आहेत व प्रश्न विचारला की कारखाना प्रकल्प विस्तारिकरणात किती झाडे लावणार आहेत?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की सद्यस्थितीत कारखान्यात १,५०,००० झाडे आहेत.

**सदस्य** यांनी टीओआरप्रमाणे प्रति हेक्टर किती झाडे लावणार व एकूण किती झाडे लावणार याची माहिती देण्यास सांगितले.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की टीओआरमध्ये १,५०० झाडे लावण्याचे निर्देश असून कारखाना २,५०० प्रति हेक्टर झाडे लावणार व एकूण २५,००० झाडे लावणार आहे.

२) **श्री रविंद्र पर्वत धावणे, शेतकरी सभासद, राहणार-लोणी बुद्रुक,तालुका-राहाता, जिल्हा - अहमदनगरः-**

**श्री धावणे** यांनी सांगितले की ते शेतकरी सभासद असून प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा आहे. त्यांनी विचारणा केली की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे स्थानिक शेतक-यांना खते उपलब्ध होणार का?

**प्रकल्पाचे अधिकारी** व पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिक शेतक-यांना कंपोस्ट खत उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) **<u>श्री अमोल अंबादास थिटे, शेतकरी सभासद, राहणार-कोल्हार भगवतीपूर, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

श्री थिटे यांनी प्रकल्प विस्तारिकरणास समर्थन दिले.

**सदस्य** यांनी आपण कारखान्यात काम करता का याबाबत विचारणा केली.

**श्री थिटे** यांनी कंपनी काम करत नसल्याचे सांगून शेतकरी सभासद असल्याचे सांगितले.

४) **<u>श्री विजय उत्तमराव कड्, राहणार-तिसगाव, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री कडू** यांनी सांगितले की ते शेतकरी सभासद असून सदरहू प्रकल्पात पर्यावरण विभाग आहे का व असल्यास त्या विभागात किती अधिकारी, पर्यवेक्षक व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येईल?

**प्रकल्प अधिकारी** यांनी सांगितले की प्रकल्पात पर्यावरण विभाग कार्यरत आहे.

**सदस्य** यांनी मत मांडले की आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेले कितीजण पर्यावरण विभागात कार्यरत आहेत व भविष्यातील विस्तारिकरण लक्षात घेऊन किती लोकांना नियुक्ती करण्यात येईल असा प्रश्न असून त्याबाबत उत्तर देण्यात यावे.

**पर्यावरण कक्ष अधिकारी** यांनी सांगितले की ते एम.एस्सी (पर्यावरण) असून सद्या पर्यावरण विभागात आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या तीन व्यक्ती कार्यरत असून विस्तारिकरणामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अतिरिक्त तीन व्यक्तींना रोजगाराची संधि देण्यात येईल.

५) **<u>श्री भास्कर जाधव, राहणार-घुलेवाडी, तिसगाव, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री भास्कर जाधव** यांनी सांगितले की त्यांच्या पत्नी तिसगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच आहेत. तिसगाव ग्रामपंचायतीतर्फे आम्ही सदरहू प्रकल्प विस्तारिकरणाचे समर्थन करत आहोत.

६) **<u>श्री रायभान शिवराय आहेर, राहणार-लोणी बुद्रुक, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री आहेर** यांनी सांगितले की ते ऊस उत्पादक शेतकरी सभासद आहेत. त्यांनी विचारले की कारखाना रस्त्यांवर वीजेची सोय करणार आहे का व करणार असल्यास कशी करणार आहे ?

**प्रकल्प अधिकारी** यांनी उत्तर दिले की कारखान्याने बाहेरील रस्त्यावर वीजेची सोय केलेली असून अंतर्गत रस्त्यांवर वीजेची सोय करण्यात येईल.

**सदस्य** यांनी कुठले दिवे पुरविण्यात येतील अशी विचारणा केली असता सोलर एलईडी पुरविण्यात येतील असे उत्तर देण्यात आले.

७) **श्री रविंद्र बेंद्रे, राहणार-बाभळेश्वर, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री बेंद्रे** यांनी प्रकल्प विस्तारिकरणास समर्थन दिले.

८) **श्री जगन्नाथ बन्सीलाल राठी, राहणार-लोणी बुद्रक, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री राठी** यांनी प्रकल्पास समर्थन असल्याचे सांगताना विस्तारिकरण प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे अशी सूचना केली.

**सदस्य** यांनी प्रकल्प प्रवर्तकांना स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

**प्रकल्प अधिकारी** यांनी सांगितले की स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येणार असून १५० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार मिळेल तर विस्तारिकरणामुळे जवळजवळ ४०० व्यक्तींना अप्रत्यक्षपणे फायदा होणार आहे.

९) **श्री प्रकाश दगडू खरडे, उपसरपंच, कोल्हार भगवतीपूर ग्रामपंचायत, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री प्रकाश दगडू खरडे** यांनी विचारले की कारखाना स्थानिक लोकांना आरोग्यसेवा कशी पुरविणार आहे ?

**सुरक्षा अधिकारी** यांनी सांगितले की कारखान्यात आरोग्य व सुरक्षिततेसाठी बाह्य रुग्ण विभाग (OPD) आहे व गंभीर इजा (serious injury) झाल्यास येथून पाच किलोमीटर अंतरावर प्रवरा मेडिकल हॉस्पिटल आहे. तेथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत. तसेच

कुठलीही गंभीर घटना झाल्यास कारखान्याकडे कार्डिएक रुग्णवाहिका आहे.

१०) **श्री राजेन्द्र किवनाथ चेचरे, राहणार-लोहगांव,तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री चेचरे** यांनी विचारले की कारखान्याच्या सामाजिक उपक्रमांतर्गत आजूबाजूच्या परिसरातील ज्या शाळा आहेत व सार्वजनिक जागा उपलब्ध आहेत त्याबाबत काही सामाजिक उपक्रम राबविणार आहेत काय?

**प्रकल्प अधिकारी** यांनी सांगितले की पूर्वीपासून परिसरातील शाळांमध्ये उपक्रम राबविण्यात आलेले आहेत. त्यात शाळेची इमारत बांधणे, शाळा डिजिटायझेशन करणे असे विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. ते पुढेही चालू ठेवण्यात येतील.

११) **श्री रुषिकेश सुनील खांदे, राहणार-भगवतीपूर, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री खांदे** यांनी विचारले की या प्रकल्पामुळे माझे विहिरीचे पाणी खराब होऊ शकते का?

**प्रकल्प अधिकारी** यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यात सांडपाणी concentration करुन जाळणार आहोत. त्यामुळे कारखान्याच्या बाहेर एक थेंबही पाणी जाणार नाही. जे पाणी कन्डेनसेटमुळे तयार होईल त्यावर सीपीयुमध्ये प्रक्रिया करण्यात येणार आहे व त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे

ताज्या पाण्याची (fresh water) गरज कमी होऊन आजूबाजूच्या परिसरातील विहिरी व बोअर या प्रदूषित होणार नाहीत याची खात्री कारखाना देत आहे.

१२) **<u>श्री राहूल मच्छिंद्र धावणे, राहणार-लोणी बुद्रुक, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री धावणे** यांनी विचारले की प्रकल्पात उत्पन्न होणा-या धुरामुळे आजूबाजूच्या शेतातील पीकांवर काही परिणाम होईल का?

**सदस्य** यांनी पर्यावरण सल्लागार यांना आपण संबंधित व्यक्तीच्या गावाचे एबियंट हवा गुणवत्ता सर्वेक्षण केले आहे का याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली. तसेच संबधित व्यक्ती, त्यांचे गाव व वा-याची दिशा याबाबत माहिती देण्याची सूचना केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी माहिती दिली की आम्ही हवा गुणवत्ता मोजमाप केलेली आहे. त्यानुसार आसवणी प्रकल्प विस्तारिकरणामुळे लोणी गावात व आजूबाजूच्या परिसरात कुठ्याही प्रकारच्या हवा प्रदूषणात वाढ होणार नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पात इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित होणार असून त्यास अत्याधुनिक अशी इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे व त्यास ९० मीटर उंचीची चिमणी लावण्यात येईल.

**सदस्य** यांनी कारखान्यात ऑनलाईन कन्टिन्युअस मॉनिटरींग स्टेशन (OCEMS) कार्यान्वित असल्यास त्याचे परिणाम (results) सांगावे अशी सूचना केली.

**प्रकल्प अधिकारी** यांनी सांगितले की बॉयलरमध्ये उत्पन्न होणारी राख ही ईएसपीमुळे बाहेर उडणार नाही. त्यामुळे ती परिसरातील पिकांवर पडणार नाही, हवेत कुठलाही वाईट परिणाम होणार नाही व लोकांच्या आरोग्यावर कुठलाही वाईट परिणाम होणार नाही.

१३) **<u>श्री बाबासाहेब पुंडलिक चेचरे, राहणार-लोहगाव, तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

**श्री चेचरे** यांनी सांगितले की सदरहू विस्तारिकरण प्रकल्प हा आमच्या गावाजवळ होत आहे. आमच्या गावात १० वीच्या पुढे शिकलेले बरेच तरुण तरुणी आहेत. तरी आमच्या गावातील जास्तीतजास्त मुलांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी.

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी उत्तर दिले की प्रकल्पात स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात येते. तरी त्यांच्या गावांतील तरुण तरुणींना रोजगाराची संधि देण्यात प्राधान्य देण्यात येईल.

**सदस्य**, यांनी पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की आपण हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला नाही. अध्यक्ष व सदस्य यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्रुटी दाखविलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालास म.प्र.नि. मंडळाचा भेट अहवाल लावणे हे

पूर्णपणे चुकीचे आहे. जनसुनावणीतील सूचनांप्रमाणे त्यात सुधारणा करण्यात याव्यात.

**अध्यक्ष** यांनी खालील सूचना केल्याः-

१) कारखान्यातर्फे प्रकल्पातील सर्व प्रदूषणाची पातळी ही कारखान्याच्या प्रवेशव्दारावर दर्शनीभागावर लावण्यात यावी.

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सूचना करण्यात येते की प्रकल्प परिघातील सर्व अधिसूचित शासकीय कार्यालये व ग्रामपंचायती यांना जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आणि कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. तरी संबंधित कार्यालयाकडून प्रसिध्दी अहवाल म.प्र.नि.मंडळ कार्यालयात प्राप्त झाला का याची खात्री करण्यात यावी.

३) कारखान्यातर्फे परिघातील सर्व गावांतून नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात यावे. त्यात हवेच्या प्रदूषणामुळे जे आजार होतात असे किती रुग्ण आहेत, जलप्रदूषणामुळे जे आजार होतात असे किती रुग्ण आहेत, या दोन बाबींबाबत सर्वेक्षण गावातील सार्वजनिक आरोग्य केंद्र वा प्रवरा आरोग्य केंद्रातर्फे करण्यात यावे. एका महिन्यात त्याबाबतचे अभिप्राय सादर करण्यात यावेत.

४) कारखान्याने आपत्ती व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) बाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. पूर्वी येथे अपघात झालेला होता. त्या अनुषंगाने काळजी घेण्यात यावी.

५) सदरहू प्रकल्पाची उत्पादन क्षमता ही चौपट वाढणार आहे. म्हणजे येथील विविध यंत्रे, मनुष्यबळ यातही वाढ होणार आहे. आपणास माहिती आहे की इथेनॉल हे अत्यंत स्फोटक आहे. तरी आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षितता, आगीपासून संरक्षण याबाबत विशेष खबरदारी घेण्यात यावी. त्यासाठी मॉक ड्रिल्स वर्षातून किमान चार वेळा घेण्यात यावेत.

६) ऊस वाहतुक करणा-या वाहनांना रेडियंट रिफ्लेक्टर लावावेत व या वाहनांमध्ये टेपरेकॉर्डरचा वापर बंद करावा. तसेच सर्व वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्राची तपासणी करावी.

७) मुख्य रस्त्यावरुन कारखान्याकडे वळणाच्या जागेवर एकतरी वार्डन नेमण्यात यावा.

८) सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्पात रोजगाराची संधि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपलब्ध होणार आहे. त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे.

**अध्यक्ष** यांनी पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ज्या त्रुटी आहेत त्या दुरुस्त करण्यात याव्यात.

**सदस्य** यांनी सांगितले की प्रकल्प विस्तारिकरण हे ६० केएलपीडी ते २४० केएलपीडी पर्यंत करणार आहे, मोलॅसिस स्टोरेज टाकीबाबत विशेष लक्ष देण्यात यावे कारण ते फुटून मळी शेतात जाते व आजूबाजूच्या शेतक-यांना त्रास होतो. तरी सदरहू मोलॅसिस टाकी ही सक्षम शासकीय विभागाकडून तपासून घेण्यात यावी व मोलॅसिस टाकी सुरक्षित असावी.

**आयोजक** यांनी सर्व उपस्थितांचे,पत्रकार, शासकीय अधिकारी, स्थानिक जनतेचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने जनसुनावणी ही संपन्न् झाल्याचे घोषित केले.

**(संजीव अ. रेदासनी)**
आयोजक ,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक
अधिकारी,
मप्रनि मंडळ
अहमदनगर,

**(डॉ. प्रवीण एम. जोशी)**,
सदस्य**,**
पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,
नाशिक

**(संदीप निचित),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर